**उप अभियंता संवर्गातील पदोन्नत अभियंत्यांना व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याच्या कार्यवाही संबंधी सूचना देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
शासन परिपत्रक क्र. परीक्षा-२०२५/प्र.क्र.४२/आ.प्रशि
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४००० ०३२.
दिनांक:- २५जुलै, २०२५

**वाचा** :-

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण २३१८/प्र.क्र.३/का.१७, दि.०१.०३.२०१८.

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन शुद्धीपत्रक क्रमांक- संकीर्ण २३१८/प्र.क्र.३/का.१७, दि.११.०८.२०२२.

३) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका, १९८४.

**परिपत्रक**

जलसंपदा विभागातील उप अभियंता संवर्गातील अभियंत्यांच्या व्यावसायिक परीक्षा घेण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका, १९८४ परिशिष्ट-१ मधील नियम लागू आहेत. सदर नियमपुस्तिकेतील परिशिष्ट-१ नुसार विभागप्रमुखाचा दर्जा असलेल्या अधिका-यांना परीक्षेसाठी समित्या आमंत्रित करण्याच्या आणि एखादा अधिकारी उत्तीर्ण किंवा अनुत्तीर्ण झाला आहे यासंबंधातील समितीच्या अहवालावर निर्णय घेण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

२. तथापि, उप अभियंता संवर्गातील पदोन्नत अभियंत्यांना व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट (शासन सेवेत १५ वर्षे सेवा पूर्ण/ वयाची ५० वर्षे पूर्ण) प्रदान करणेबाबतची काही प्रकरणे शासन स्तरावर मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहेत, तर काही प्रकरणांबाबतची कार्यवाही नियंत्रक अधिकारी या नात्याने मुख्य अभियंता स्तरावरच करण्यात येत आहे. सदर बाब विचारात घेऊन, शासकीय कामकाजामध्ये एकसूत्रता राखण्याच्या दृष्टीने यापुढील प्रस्तावासाठी खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत-

"सदर शासन परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून उप अभियंता संवर्गातील पदोन्नत अभियंत्यांना व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट प्रदान करणेबाबतची कार्यवाही मुख्य अभियंता स्तरावर न करता याबाबतचे परिपूर्ण प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात यावेत."

**(सुहास जाधवर)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:** —

१. सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग.
२. महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षितता (मेरी) नाशिक.
३. सह सचिव (प्रशा) /उप सचिव (सेवा) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

४. सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
५. सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
६. सर्व कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग.
७. कक्ष अधिकारी, आ (वर्ग-२), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवड नस्ती,आ. प्रशि कार्यासन.